# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## स्थानिक संस्था कर विभाग

### अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२
दि. १२ मे, २०१५.

महाराष्ट्र महानगरपालिका
अधिनियम

क्रमांक स्थासंक–२०१५/प्र.क्र. ८२/नवि–३२,–महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२ न च्या पोट–कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० यामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन उक्त कलम १५२ न च्या पोट–कलम (२) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे यामुळे बाधित होण्याचा संभव असणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी खालील अधिसूचनेचा मसुदा प्रसिध्द करीत असून याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासन सदर मसुदा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २० दिवसाचा कालावधी संपल्यानंतर विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याबाबत वरील कालावधी समाप्तीच्या पूर्वी सचिव (नवि–२), नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२ यांना प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती व सूचनांवर शासनाकडून विचार करण्यात येईल.

### अधिसूचनेचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१० च्या नियम, ४८ मधील पोट नियम ८ नंतर खालील पोट नियम समाविष्ट करण्यात येईल –

(९) (अ) – या नियमात काहीही अंतर्भूत असले तरीही राज्यशासन राजपत्रातील अधिसूचनेव्दारे स्थानिक संस्था कराचा भरणा करण्याकरीता अभय योजना घोषित करु शकेल.

(ब)– ज्यावेळी अशी योजना घोषित करण्यात आली असेल त्यावेळी स्थानिक संस्था कराचा भरणा करण्यास पात्र आहेत असे व्यापारी किंवा व्यक्ती त्या योजनेत विनिर्दीष्टीत केलेल्या कालावधीत स्थानिक संस्था कराचा भरणा महानगरपालिका आयुक्तांना करतील.

(क)– असा कराचा भरणा केल्यानंतर असे व्यापारी किंवा व्यक्ती यांना देय असलेल्या स्थानिक संस्था कराच्या रक्कमेवर दंड किंवा व्याज देय असणार नाही आणि अशा व्यापारी किंवा व्यक्ती विरुध्द कोणतीही कार्यवाही सुरु केली असल्यास ती थांबविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. आ. लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन,

क्र. ६८
दिनांक :१५/५/२०१५

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे – ४११०१८.

8x13

# Pimpri Chinchwad Municipal Corporation

## Local Body Tax Department

### NOTIFICATION

**Urban Development Department**
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai-400 032
Date - 12 May, 2015

Maharashtra Municipal
Corporation Act

No. LBT- 2015/CR-82/UD-32. The following draft of rules further to amend the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 152T of the Maharashtra Municipal Corporation Act (LIX of 1949) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (2) of the said section 152T of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of a period of twenty days form the date of publication of this notification in the Maharashtra Government Gazette.

2. Any objection or suggestions which may be received by the Secretary (UD-2) Urban Development Department, Government of Maharashtra, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai - 400 032, from any person with respect to the said draft, before the expiry of the above mentioned period will be considered by the Government.

### DRAFT RULES

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) (Amendment) Rules, 2015.
2. In rule 48 of the Maharashtra Municipal Corporations (local body Tax) Rules, 2010, after sub-rule (8), the following sub-rule shall be added namely :-

"(9) (a) Notwithstanding anything contained in these rules, the State Government may, by notification in the Official Gazette, notify Amnesty Scheme for payment of Local Body Tax;
(b) Where such Scheme has been declared the dealer or the person liable to pay Local Body Tax may pay the amount of Local Body Tax to the Commissioner, within the period specified in the Scheme;
(c) upon such payment, no penalty or interest shall be payable by such dealer or person on the amount of Local Body Tax payable by him and, if, any proceedings are already initiated against such dealer or person, the same shall be dropped,"

**By Order and in name of the Governor Of Maharashtra,**

**G. A. Lokhande,**
**Deputy Secretary to Government**

No. 68
Date :15/5/2015

**Commissioner**
**Pimpri Chinchwad Municipal Corporation**
**Pimpri Pune 411 018. 18**

8x17